जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८८७ दिनांक -१९ /१२/२०२३**

स्वारगेट पोलीस ठाणे पुणे शहर

# दुचाकीगाडी चोरी करुन तिचे वरुन घरफोडी करणा-या अट्टल सराईत गुन्हेगारास केले जेरबंद

स्वारगेट पोलीस ठाणे पुणे शहर गुन्हा रजि.नं. ३३५/२०२३ भा.द.विकलम ३७९ मधील फिर्यादी यांची ॲक्टीवा गाडी हि राहते घराचे पार्किंगमध्ये लॉककरुन पार्ककरुन ठेवली असता सदरची ॲक्टीवा गाडी कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे संमती शिवाय चोरुन नेली आहे. म्हणून फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दाखल गुन्हयातील चोरीस गेले वाहनाचा व अज्ञात चोरटयाचा हददीमध्ये शोध घेत असताना तपास पथकातील पोलीस अंमलदार **शिवदत्त गायकवाड, अनिस शेख व रमेश चव्हाण** यांना त्यांचे बातमीदारमार्फत बातमी मिळाली कि, सदर गुन्हयातील चोरी गेलेले वाहन व आरोपी हे वाहनासह स्वारगेट कॅनॉलजवळ चहाचे गाडयावर थांबले आहेत अशी गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर बातमी मिळाली असल्याबाबत प्रतापसिंह शेळके पोलीस उपनिरीक्षक स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे यांना माहिती दिल्याने त्यांनी लागलीच खात्रीकरुन कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेशित केले होते.

पोलीस उपनिरीक्षक प्रतापसिंह शेळके व तपास पथकातील पोलीस अंमलदार याचेसह बातमीचे ठिकाणी जावुन खात्री केली असता सदर गुन्हयातील चोरीस गेलेली ॲक्टीवा गाडी हि दिसुन आली व त्यावर दोन इसम बसलेले दिसुन आल्याने त्यांना वरील स्टाफचे मदतीने ताब्यात घेवुन त्यांना नाव व पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव **१) पियुष गणेश भरम वय २२ वर्षे रा. आंबेगाव पठार पुणे २) विवेक उत्तम मोरे वय २४ वर्षे रा. पवार नगर गुजर वाडी कात्रज पुणे** असे असल्याचे सांगितले. तसेच तपासा दरम्यान आरोपींनी सांगितले कि सदर गाडी चोरी करुन शिंदेवाडी येथील वाघजाई मंदीरातील दान पेटीतील पैसे चोरी केले असल्याचे सांगितल्याने सदरबाबत राजगड पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नं ७३१/२०२३ भादंवि कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल असुन दाखल गुन्हयातील आरोपीतांकडुन तपासादरम्यान दाखल गुन्हयातील चोरी केलेली ॲक्टीवा व रोख रक्कम असा मिळुन एकुण १३,७६०/- रु किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर श्री.प्रविणकुमार पाटील,मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-२,पुणे श्रीमती स्मार्तना पाटील मा.सहा.पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे श्री.नारायण शिरगांवकर यांचे मार्गदर्शनाखाली स्वारगेट पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सुनिल झावरे,पोलीस निरीक्षक (गुन्हे)श्री.सोमनाथ जाधव,यांच्या आदेशान्वये तपास पथकातील सहा.पोलीस निरीक्षक प्रशांत संदे,पोलीस उपनिरीक्षक प्रतापसिंह शेळके,पोलीस अंमलदार शिवदत्त गायकवाड, अनिस शेख, फिरोज शेख, रमेश चव्हाण, संदीप घुले, दिपक खेंदाड, सुजय पवार, सोमनाथ कांबळे, यांनी एकत्र मिळुन केली आहे.